# A ONE DAY WORKSHOP ON JADUTONA







# पवार महाविद्यालयात जादूटोणाविरोधी कार्यशाळा

**कापडगाव :** लोणंद येथील शरदचंद्र पवार महाविद्यालयातील विवेक वाहिनीच्या वतीने शिवाजी विद्यापीठ अग्रणी कॉलेज योजनेअंतर्गत 'जादूटोणा विरोधी कायदा २०१३ प्रभावी अंमलबजावणी व प्रसार' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. टी. एन. घोलप यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रधान सचिव प्रशांत पोतदार यांनी प्रशिक्षण दिले. समितीचे राज्यवाहक भगवान रणदिवे यांनी बुवाबाजी, चमत्कार व विज्ञान या विषयासंबंधी चमत्काराची प्रात्यक्षिके सादर करून बुवाबाजीच्या दांभिकतेचे दर्शन सादर केले.

विद्यार्थ्यांना जादूटोणाविरोधी कायद्याची सविस्तर माहिती देऊन हा कायदा देवा धर्माच्या विरोधात नसून जादूटोणा, आघोरी प्रथा व अनिष्ठ प्रथांचे उच्चाटन करण्यासाठी आहे, असे सांगण्यात आले. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यार्थ्यांना कर्तव्याची जाणीव करून देण्यात आली.

या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. वाघमारे यांनी काम पाहिले. कार्यशाळेत महाविद्यालयाचे दोनशे विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. (वार्ताहर)